


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे  अंक : २६९ वा  शनिवार  दि. २८ डिसेंबर २०२४  पृष्ठ ८  किंमत ३रुपये

# उद्धव ठाकरेंची योजना, स्वबळाची मनोकामना आगामी राज्यसह बीएमसी निवडणुकीसाठी...

वृत्तसंस्था/मुंबई

२०१७ मध्ये बीएमसीची सत्ता काबीज करण्यात चुकलेला भाजप मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत प्रत्येक पद्धतीचा अवलंब करू शकतो, याची उद्धव ठाकरेंना जाणीव आहे. आणि म्हणूनच महाविकास आघाडीचे नाव न घेता शिव-सेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीची तयारी पूर्ण ताकदिनीशी सुरू केली आहे. कोणत्या भागातील नेत्यांची सभा कधी होणार, याचे योग्य नियोजन करण्यात आले असून, उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर मॅरेथॉन सभा सुरू केली असल्याचे पहायला मिळत आहे. शिवाय त्यांना रिपोर्ट कार्ड देण्यासही सांगण्यात आले आहे. ज्या रणनीतीमुळे भाजपला ४ जागांवरून थेट ४८ जागांवर नेले ती २०२० च्या हैदराबाद महापालिका निवडणुकीची रणनीती भाजप मुंबईतही अवलंबू शकते, असे जाणकारांचे मत आहे. २६ डिसेंबर ते २९ डिसेंबर दरम्यान उद्धव ठाकरे मुंबईत अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. उद्धव ठाकरे स्वत: बैठकीद्वारे आढावा घेणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालानंतर मुंबईत विधानसभा निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी प्रभागनिहाय शाखाप्रमुख आणि विभागप्रमुखांशी संवाद साधला. यानंतर २१ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत निरीक्षकांनी अहवाल उद्धव ठाकरे यांना सादर केला. महिला आघाडी आणि लोकाधिकार समिती, भारतीय कामगार सेना, युवा सेना, विद्यार्थी सेना या संलग्न संघटनांनाही सक्रिय करायचे आहे ज्याद्वारे,शिवसैनिकांचे प्रबोधन करता येईल.



विधानसभा निवडणुकीत राज्यातील २० जागांपैकी १० जागा एकट्या मुंबईतून जिंकल्यामुळे मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकणे उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसे-नेला आवश्यक आहे , कारण मुंबईचा विजय त्यांना तारेल, असे जाणकारांचे म्हणणे आहे. मुंबईतील शिवसेनेची खरी ताकद म्हणजे पक्षाची छोटी कार्यालये. मुंबईत शिवसेनेच्या शाखांची संख्या २२७ म्हणजेच बीएमसी वॉर्ड इतकीच आहे. संपूर्ण उपनगर आणि ठाणे यासह ५०० हून अधिक शाखा आहेत. शिवसेना आणि भाजपमधील फुटीमुळे गेल्या काही वर्षांत शाखांची रचना काही प्रमाणात कमकुवत झाल्याने निवडणुकीपूर्वी ही शाखा रचना मजबूत करण्यात उद्धव ठाकरे व्यस्त आहेत.

---

# अवकाळी पावसाची हजेरी हरभरा पिकाला फटका!

जनसंचलन/ वडगाव

परिसरात शुक्रवारी आलेल्या अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे रब्बी हंगामातील बहरलेल्या हरभऱ्याला फटका बसला. फुलगळ झाल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिसरात अवकाळी पावसाची शक्यता असल्याने शेतकरी धास्तावला आहे. गेल्या चार ते पाच वर्षांपासून अतिवृष्टी, अवर्षण, अवकाळी, वादळी वारा, गारपीट असे संकटे येऊन पिकांची नासाडी होत आहे. यंदाच्या खरीप हंगामात सत-तचा पाऊस व परतीच्या पावसाने नुकसान केल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मदार ही रब्बी हंगामावर होती.



रब्बी हंगामात जिवापाड कष्ट करून शेतशिवार फुलवले. शेतशिवारात गहू, मका, ज्वारी, टरबूज, खरबूज, कांदा या पिकांसह भाजीपाला वर्गीय पिके बहरली आहेत. सध्या हरभरा पीक फुलोरा अवस्थेत आहे. त्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने पिकाला फटका बसला आहे. मोठ्या प्रमाणात फुलगळ झाल्याने उत्पादनात घट होण्याची भीती आहे. पुन्हा पावसाची शक्यता असल्याने शेतकरी धास्तावला आहे.

## नांदुरा शहरात भंगार व्यावसायिकावर छापे

## व्यावसायिकातील वाद विकोपाला

जनसंचलन/ नांदुरा

शहरातील प्रमुख भंगार व्यावसायिकांवर कर विभागाच्या वरीष्ठ कार्यालयातील अधिकाऱ्यानी छापे मारून दुकानाची व विविध ठिकाणाची तपासणी केली. हे छापे जीएसटीचे की आयकर विभागाचे असा सवाल उपस्थित होत आहे. शहरात काही दिवसांपूर्वी भंगारचा व्यवसाय करणाऱ्यांकडून चोरीचा माल पकडला होता. आजही भंगाराच्या व्यवसायात दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याने नांदुरा शहरात जीएसटी व आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांची नजर अनेक व्यावसायिकांवर आहे. यामुळे नांदुरा शहरात आणखी छापे पडणार असल्याची चर्चा नांदुरा शहरात सुरू आहे. २७ डिसेंबर रोजी नांदुरा शहरा-तील खामगाव रोडवरील एका भंगार व्यावसायिकाकडे अचानक छापे मारल्याने शहरात उलट सुलट चर्चा सुरू आहे. अधिकारी तोंडाला रुमाल बांधून आले असल्याने ते विभागाचे अधिकृत अधिकारी आहेत की अधिकारी असल्याचा बनाव करीत छापे मारत आहेत, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. व्यावसायिक स्पर्धेतून तसेच पोलिसांशी काही व्यावसायिकांचा असलेला वाद विकोपाला गेल्याने हा प्रकार घडल्याची जोरदार चर्चा शहरात होत आहे. त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहे.

## संपादकीय लेख

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक !

भारताचे वे१४ पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जाते. कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख अभ्यासा... संपादक्.

माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचा जन्म दि.२६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ. सिंग यांनी सन १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंड मधील केम्ब्रिज विद्यापीठापर्यंत विस्तारलेले आहे. सन १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर सन १९६२ साली डॉ.सिंग यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केले. त्यांचे इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स अन्ड प्रोस्पेक्ट्स फोर सेल्फ ससटेन्ड ग्रोथ हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे. सर्व सामान्यांचे मत आहे की, असा अर्थमंत्री पुन्हा होणे नाही. माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचा अल्पपरिचय- डॉ.मनमोहन सिंह यांनी सन १९९१मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना उदारीकरणाचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक ठरला. त्यांच्या या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला एका वेगळ्या उंचीवर नेलं. डॉ.मनमोहन सिंह यांच्या उदारीकरणाच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट केलं. डॉ.मनमोहन सिंह यांनी देशाला यशाच्या एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक म्हणून डॉ.मनमोहन सिंग यांना ओळखले जाते. डॉ.मनमोहन सिंग यांनी भारताचे वे१४ पंतप्रधान होते. डॉ.मनमोहन सिंग हे एक विचारवंत आणि अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता आणि विनम्र आचरणामुळे ते कायमच चर्चेत असायचे.



डॉ.मनमोहन सिंग यांनी पंजाब विद्यापीठ आणि दिल्ली स्कूल ऑफ इकोनोमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी युएनसीटीएडी सचिवालयात काही काळ काम केले. यानंतर सन १९८७ आणि १९९० या काळात त्यांची जीनिव्हा येथील साऊथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी सन १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली. यानंतर सन १९७२ साली डॉ.मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अर्थमंत्रालयात अनेक महत्वाची पदे भूषवली. यात अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद या पदांचा समावेश होता. यानंतर सन १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात ते भारताचे अर्थमंत्री होते. हा काळ स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानला जातो. डॉ.मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले धोरण तयार केले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना अनेक महत्वाचे पुरस्कार मिळाले. डॉ.मनमोहन सिंग यांना सन १९८७ या काळात भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण मिळाला. त्यानंतर भारतीय विज्ञान कॉंग्रेसमध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान- १९९५, अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड- १९९३ आणि १९९४, केम्ब्रिज विद्यापीठाचा अॅडम स्मिथ पुरस्कार- १९५६, केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार, असे काही विशेष पुरस्कार मिळाले. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बूनसारख्या अनेक संस्थांनी त्यांना सन्मानित केले. केम्ब्रिज आणि ऑक्सफोर्डसारख्या अनेक विद्यापीठांकडून डॉ.मनमोहन सिंग यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी सन १९९३मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. डॉ.मनमोहन सिंह यांनी सन २००४ ते २००९ असे दोन वेळा भारताचे पंतप्रधान पद भूषवले. लोकसभेची निवडणूक न जिंकणारे आणि राज्यसभेचे सदस्य असताना हे पद भूषविणारे ते पहिले पंतप्रधान होते. त्यांच्या कार्यकाळात आर्थिक विकास आणि सामाजिक नियोजनावर विशेष भर देण्यात आला.

भारताचे दिग्गज माजी पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंह यांचं दि.२६ डिसेंबर, गुरुवारी निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशभरात शोककळा पसरली आणि राजकीय वर्तुळात सात दिवसांचा दुःखवटा जाहीर करण्यात आला आहे. डॉ.मनमोहन सिंग यांच्या पश्चात पत्नी गुरशरण कौर आणि तीन मुली असा परिवार आहे. साहित्य, संगीत आणि अध्यात्मांत त्यांना प्रचंड रस होता. डॉ.मनमोहन सिंह यांच्या निधनाचे वृत्त समजताच देशभरात शोककळा पसरली. !! भारताचे महान नेते डॉ.मनमोहन सिंग यांच्या पावन चरणी सप्ताहभर ही श्रद्धासुमने समर्पित !!

**लेखक**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# नायलॉन मांजा निर्मिती, वापर व विक्री करणाऱ्यावर होणार कार्यवाही

**जनसंचलन/बुलढाणा**

मकर संक्रांतीच्या अगोदर व नंतर काही दिवस पतंग उडविण्याचे प्रमाण जास्त असते. त्यासाठी नायलॉन मांजा (दोरा) या धाग्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तसेच या मांजामुळे मानवी जीवितास, पशु-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होऊन जखमी व मृत होण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. पर्यावरण अधिनियमानुसार संपूर्ण जिल्ह्यात नायलॉन मांजाचा वापर, विक्री व निर्मिती करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती वा संस्था यांनी उल्लंघन केल्यास पर्यावरण(संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहिल, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे


# भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे निधन

## सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**



भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले. डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत. डॉ. मनमोहन सिंग यांना शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

# बुलढाणा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी मनोहर मोरे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी मनोहर हरिभाऊ मोरे हे नियत वयोमानानुसार ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा दहिद बु .केंद्र पाडळी पंचायत समिती, बुलढाणा या ठिकाणी सेवानिवृत्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री. मोरे यांचे सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दहिद बुद्रुक गावचे सरपंच अर्जुन भाऊ दांडगे, प्रमुख अतिथी दहिद बुद्रुक गावचे भूमिपुत्र अनिलजी देवकर, जिल्हा परिषद उपशिक्षण अधिकारी तसेच पंचायत समिती बुलढाणाचे गटशिक्षणाधिकारी पी.एस.मोरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दहिद बुद्रुक गणेशजी देवकर,पाडळी केंद्राच्या केंद्रप्रमुख सुनिता शिंदे, डोंगर खंडाळा केंद्राचे केंद्रप्रमुख इंगळे, पांगरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. म्हस्के, बुद्रुक गावचे तंटामुक्ती अध्यक्ष राजूभाऊ राजपूत, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य दहिद बुद्रुक ज्ञानेश्वर राऊत आदि उपस्थित होते. सर्वप्रथम सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब तसेच विद्येची आराध्य देवी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रतिमापूजनानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आयएसओ दर्जा प्राप्त शाळा इजलापुर या शाळेला आयएसओ दर्जा मिळवून देणारे मुख्याध्यापक शरदचंद्र बोराडे, आर. पी. जाधव, सहायक अध्यापक इजलपुर मुरलीधर टेकाळे यांचे मान्यवरांच्या हस्ते विशेष स्वागत आणि सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख सुनिता शिंदे यांनी केले. प्रास्ताविकानंतर आजच्या सेवानिवृत्ती गौरव सोहळ्याचे सत्कारमूर्ती पाडळी केंद्राचे माजी केंद्रप्रमुख तथा विद्यमान शिक्षण विस्तार अधिकारी मनोहर हरिभाऊ मोरे यांचा जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी



पी.एस.मोरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळा आटोपल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी श्री. मोरे यांच्या कार्यकर्तृत्वाच्या संदर्भात मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पंडित सपकाळ यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक अध्यापक दहिद बुद्रुक जयश्री जाधव यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद शाळा दहिद बुद्रुक येथील श्री पालकर, श्री मुळे, सौ. गायकवाड तसेच पाडळी केंद्रातील सर्व शिक्षक वृंद गणेश भाऊ देवकर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, समिती सदस्य यांनी मेहनत घेतली

# जिजामाता महाविद्यालयात स्व. पंतप्रधान डॉ मनमोहनसिंग यांना श्रध्दांजली डॉ पंजाबराव देशमुख अभिवादन कार्यक्रम....

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक जिजामाता महाविद्यालयात दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी प्राचार्य डॉ सुरेश गवई यांचे अध्यक्षतेखाली, नुकतेच निधन झालेले भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहनसिंग यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. श्रध्दांजली कार्यक्रमास आयक्युएसी समन्वयक प्रा डॉ सुबोध चिंचोले, प्रा मृणालिनी सपकाळ , प्रा. संजय सोनुने, प्रा डॉ. एस. एल. कुंभारे, विनोद आराख तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी प्रा डॉ जे जे जाधव यांनी स्व. पंतप्रधान डॉ मनमोहनसिंग यांच्या अर्थमंत्री पद व पंतप्रधान पदाच्या कामगिरीवर प्रकाश टाकला.

त्याचप्रमाणे त्यानंतर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमही घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. सी. सी. चे प्रमुख लेफ्टनंट प्रा पवन ठाकरे यांनी केले.






# वीर बाल दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा

वीर बालदिवसफ निमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते साहिबजादे बाबा जोरावार सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.






# जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा



जिल्हाधिकारी कार्यालयात भाऊसाहेब ऊर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, नायब तहसीलदार प्रमोद करे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर आर्दीनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# माजी सैनिक व विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना

जनसंचलन/बुलढाणा




माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांसाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. ज्यांनी काही कारणास्तव प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनाचे () फॉर्म वेळेवर भरले नाही, अशा सर्व माजी सैनिक, विधवा पत्नी, युद्ध विधवा यांच्यासाठी अर्ज सादर करण्याची लिंक दि. ३० डिसेंबर २०२४ ते दि. ३ जानेवारी २०२५ पर्यंत पुन्हा उघडण्यात येत आहे. तरी माजी सैनिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी रूपाली पांडूरंग सरोदे यांनी केला आहे.

# गाता रहे मेरा दिल या हिंदी फिल्मी गीतांच्या कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद




जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा अर्बन क्रिएटिव्ह ग्रुप व सेवन स्टार म्युझिकल ग्रुप अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्तुत गाता रहे मेरा दिल या हिंदी फिल्मी गीतांच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद.... दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी ब्राह्मण सभा मंगल कार्यालय, परतवाडा येथे मा.श्री. राधेश्याम चांडक (भाईजी) मा.श्री. डॉ.सुकेश झंवर व मा.सौ.कोमल मॅडम झंवर यांचे संकल्पनेतून वझ्झर येथील साईबाबा मंदिर बांधकामाच्या मदतीसाठी मा.अनंताभाऊ देशपांडे यांचे मार्गदर्शनाखाली बुलढाणा अर्बन क्रिएटिव्ह ग्रुप व सेवन स्टार म्युझिकल ग्रुप अकोला प्रस्तुत हिंदी फिल्मी गीतांचा कार्यक्रम गाता रहे मेरा दिल पार पडला असून या कार्यक्रमाला परतवाडा शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाला परतवाडा येथील पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री.म्हस्के साहेब, फॉरेस्ट अधिकारी श्री.हिंगणीकर साहेब तसेच अनंता भाऊ देशपांडे, दिपाली देसाई (सिने अभिनेत्री व पार्श्व गायिका) आणि परतवाडा येथील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून भारत मातेच्या फोटोला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. म्हस्के साहेब यांचे सुधीर भालेराव यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. श्री हिंगनीकर साहेब यांचे स्वागत प्रकाश सावळे तर अनंता भाऊ देशपांडे यांचे स्वागत श्री विठ्ठल दळवी,श्री नितीन काळे दिपाली देसाई यांचे स्वागत संजय कस्तुरे यांनी केले. आणि उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल वि. व्य.श्री.गणेश चौखंडे यांचे दिपाली देसाई यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.. गाता रहे मेरा दिल हिंदी फिल्मी गीतांच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण अनंताभाऊ देशपांडे (व्हॉइस ऑफ लता) यांच्यासह दिपाली देसाई (सिने अभिनेत्री व पार्श्वगायिका) ह्या होत्या. या सुमधुर हिंदी फिल्मी गीतांच्या कार्यक्रमांमध्ये तनुश्री भालेराव,सीमा मोहोड,सुभाष साबळे, दिनकर पांडे, डॉ.जितेंद्र राजकुमार यांनी आपले गीत सादर केले बऱ्याच गीतांना प्रेक्षकांकडून वन्स मोर ची फर्माईश मिळाली होती. सदर कार्यक्रमाला श्री.जयगुरु व त्यांची टीम यांनी संगीत दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.नरेश राजपूत यांनी केले सदर कार्यक्रम यशस्वी होण्या करिता वि .व्य.श्री.गणेश चौखंडे बुलढाणा अर्बन विभागीय व्यवस्थापक परतवाडा तसेच शाखा व्यवस्थापक श्री आशिष गावंडे श्री आशिष भुतडा श्री प्रवीण ठाकरे श्री निलेश बावणेर श्री प्रशांत मोरे श्री पंकज वऱ्हाडे श्री पवन टेकाडे श्री सुनिल बारब्दे श्री प्रविण पुसदेकर श्री राजू सिसोदिया श्री राहुल थॉमस आ.रे संतोष कानेरकर गोदाम व्यवस्थापक योगेश ढेगे टेक्निशियन अमित तवर वि. सहा अमोल जोशी आणि कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमाला परतवाडा,अमरावती, अंजनगांव सुरजी,अकोला,बुलढाणा येथील प्रेक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वि.व्य श्री. गणेश चौखंडे यांनी केले.

# मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्षपद जिल्ह्याकडेच कायम!

## चंद्रकांत बर्दे यांची परिषदेकडून झाली नियुक्ती !



जनसंचलन/बुलढाणा

८५ वर्षाचा इतिहास असणाऱ्या मराठी पत्रकार परिषद, ही पत्रकारांची मातृसंस्था.. गत ३ टर्म म्हणजेच ६ वर्षापासून या संघटनेचे राज्य उपाध्यक्षपदी दै.देशोन्नतीचे जिल्हा प्रतिनिधी राजेंद्र काळे हे होते. त्यांचा कार्यकाल संपल्यानंतर आता हे पद पुन्हा बुलढाणा जिल्ह्याकडे कायम राहिले असून, या पदावर परिषदेने चंद्रकांत बर्दे यांची अमरावती विभागातून नियुक्ती केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाच्या नियुक्ता नुकत्याच परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीकर यांनी जाहीर केल्या असुन प्रदेश उपाध्यक्षपदी बुलढाण्याचे चंद्रकांत बर्दे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्याकडे पश्चिम विदर्भाचा पदभार राहणार आहे. चंद्रकांत बर्दे अनेक वर्षापासून मराठी पत्रकार परिषदेशी एकनिष्ठ आहे.त्यांच्याकडे यापूर्वी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या सरचिटणीस, कार्याध्यक्ष आणि सध्या ते जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे.

त्यांची नियुक्ती जाहीर झाल्यानंतर जिल्हा पत्रकार भवन परिसरात फटाके फोडुन स्वागत केल्या गेले. यावेळी पत्रकार राजेंद्र काळे, रणजित राजपूत, संजय मोहिते,जितेंद्र कायस्थ, प्रा.सुभाष लहाने, राजेश डिडोळकर, भानुदास लकडे, सचिन लहाने, संदिप वानखडे, रहेमत अली, शौकत शहा, विनोद सावळे आदींनी स्वागत केले.

# चारचाकी-कंटेनर अपघातात तीन जण गंभीर

## जखमींमध्ये व्यापारी संघाचे अध्यक्ष राजेंद्र कोचर यांचा समावेश...




जनसंचलन/मलकापूर

खान्देशातील वरणगाव हद्दीत भरधाव चारचाकी व कंटेनरमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना बुधवारी पहाटे ४.३० वाजता राष्ट्रीय महामार्गावर बोर्डी फाट्यावरून हाकेच्या अंतरावर असलेल्या इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर घडली. त्या अपघातात मलकापूर व्यापारी संघाचे अध्यक्ष राजेंद्र कोचर यांच्यासह तीन जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर जळगाव खान्देशातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मलकापूर येथील कोचर त्यांच्या पत्नी व सहकारी व्यापारी नातेवाइकासह शुक्रवारी पहाटे मालेगाव येथील अंत्यसंस्कारासाठी निघाले होते. राष्ट्रीय महामार्ग ५३ वर वरणगाव हद्दीत चारचाकी क्रमांक एमएच-२८, आर- ३६३७ ही आडव्या आलेल्या ट्रक कंटेनर (क्रमांक जेएच-०५, ए-४७१६) वर जाऊन आदळली. यावेळी चारचाकीत बसलेले राजेंद्र नथमल कोचर, त्यांच्या पत्नी देवबाला राजेंद्र कोचर व सहकारी व्यापारी नातेवाईक सुगनचंद उत्तमचंद झांबड असे तिघे गंभीर जखमी झाले. माहिती कळताच वरणगाव पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संपर्क केल्याने मलकापूर येथून राहुल कोचर घटनास्थळी दाखल झाले.

# महाराष्ट्राला आरोग्य व विविध योजनेसाठी निधी उपलब्ध करेल!

## ना.प्रकाश आबिटकर यांनी आयुष मंत्री जाधव यांना दिला शब्द!



जनसंचलन/बुलढाणा

मुंबई येथे केंद्रीय आयुष स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांची राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सदिच्छा भेट घेतली.याप्रसंगी ना.जाधवांनी ना.आबिटकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन व स्वागत केले. ना.आबिटकर यांचे कार्य सर्वश्रुत आहे.ते दिलेला शब्द पाळतात. त्यांनी महाराष्ट्राला आरोग्य व अन्य विविध योजनासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही दिली. यावेळी महाराष्ट्राला निरोगी व आरोग्य संपन्न बनवण्यासाठी आरोग्य योजना समन्वयाने प्रभावीपणे राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. चर्चेदरम्यान मा.आ.संजय रायमुलकर व आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958